**हरित ऊर्जा निधी कार्यक्रमातंर्गत (जीसीएफ), लेखाशीर्ष क्र.२८१००१२३ अंतर्गत विविध योजना व प्रकल्पांसाठी रु. ३५.३४८७५ कोटी इतका निधी महाऊर्जा कार्यालयास उपलब्ध करून देण्याबाबत बाबत.**
**(मागणी क्र.के-६, लेखाशीर्ष क्र.२८१००१२३)**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः बियुडी-२०२४/प्र.क्र.२८/ऊर्जा-७ (ई- क्र.१५०७२७४)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: ११ मार्च , २०२६

**वाचा :-**

१. शासन निर्णय, उ.ऊ.का.व खनिकर्म विभाग क्र.अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दि.१४.१०.२००८.
२. शासन निर्णय, उ.ऊ.का.व खनिकर्म विभाग क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७, दि.३१.१२.२०२०.
३. शासन निर्णय, उ.ऊ.का.व खनिकर्म विभाग क्र.हहाधो-२०२३/प्र.क्र.२५५/ऊर्जा-७, दि.१७.१०.२०२३ व त्याअंतर्गतची शुद्धिपत्रके.
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७.०४.२०२५.
५. शासन निर्णय, उ.ऊ.का.व खनिकर्म विभाग क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९४/ऊर्जा-३, दि. १३.१२.२०२४
६. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.९४/ऊर्जा-३,दि. १५.०९.२०२५.
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं २०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०८.१०.२०२५ व दि.२९.०१.२०२६.
८. महाऊर्जा कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. लेखा/बीपी-०२०/हरित ऊर्जा निधी: २५-२६/२०२५-२६/१२४७ दिनांक - २४ डिसेंबर, २०२५.

**प्रस्तावना:**

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण-२००८ निर्गमित करण्यात आले होते. या धोरणांतर्गत पवन ऊर्जा प्रकल्प आस्थापित केल्यास सदर प्रकल्पासाठी उभारण्यात आलेल्या निष्कासन व्यवस्थेसाठी हरित ऊर्जा निधीतून खर्चाचा परतावा देण्याची तरतूद आहे. संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० मध्ये अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांसाठी सिंगल विंडो पोर्टल विकसीत करण्याची तरतूद आहे. संदर्भाधिन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये राज्याचे हरित हायड्रोजन धोरण-२०२३ निर्गमित करण्यात आले आहे. महाऊर्जा कार्यालयाने संदर्भाधिन ८ येथील पत्रान्वये वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील हरित ऊर्जा निधी कार्यक्रम, लेखाशीर्ष क्र.२८१००१२३ अंतर्गत विविध योजना राबविण्याकरिता निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्पांतर्गत निष्कासन व्यवस्थेच्या खर्चाच्या परतावा, सिंगल विंडो पोर्टल विकसित करणे, हरित हायड्रोजन धोरणांतर्गत विविध प्रकल्प/कार्यक्रम राबविणे नविकरणीय ऊर्जेसंदर्भात पथदर्शी प्रकल्प राबविणे यांचा समावेश आहे. महाऊर्जा कार्यालयाच्या प्रस्तावानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता "मागणी क्रमांक के-६, लेखाशीर्ष क्र.२८१००१२३ अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून रूपये ३५.३४८७५ कोटी इतका निधी महाऊर्जा कार्यालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णयः-</u>**

वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील मंजूर तरतूदींमधून महाऊर्जा कार्यालयाकडून विविध धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांकरिता हरित ऊर्जा निधीतून १) मे.सुझलॉन एनर्जी लि., गंगापूर ता.जि.धुळे येथील १३१.२५ मेगावॅट पवन ऊर्जा प्रकल्पाच्या निष्कासन व्यवस्थेचा परतावा - रु.२२९६.८७५ लक्ष, २) अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांकरिता सिंगल विंडो पोर्टल विकसित करणे - रु.२००.०० लक्ष, ३) हरित हायड्रोजन धोरणांतर्गत संशोधनात्मक प्रकल्प हाती घेणे - रु.२००.०० लक्ष, ४) हरित हायड्रोजन धोरणांतर्गत स्वतंत्र कक्षाची स्थापना करणे - रु.३००.०० लक्ष ५) हरित हायड्रोजन धोरणांतर्गत पथदर्शी प्रकल्प (Data Centre) प्रकल्पाची उभारणी करणे - रु.३००.०० लक्ष ६) महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ ची अंमलबजावणीकरीता Project Management Unit स्थापन करणे - रु.१३०.०० लक्ष ७) नवीन व नवीकरणीय ऊर्जा पथदर्शी प्रकल्प - रु.१०८.०० लक्ष या प्रमाणे एकूण रु.३५.३४८७५ कोटी (अक्षरी रूपये पस्तीस कोटी चौतीस लक्ष सत्याऐंशी हजार पाचशे फक्त) इतका निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना वितरीत करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री.नारायण श्री.कराड, सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्रीम. अंकिता बोऱ्हाडे, कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी संदर्भाधीन क्र. ५ व ६ अन्वये आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक म्हणून घोषित करण्यात आलेले उप संचालक (लेखा), महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांच्या नावे अदा करण्यात यावा.

४. हरित ऊर्जा निधी अंतर्गत राबवावयाच्या योजना/घटकांवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत महाऊर्जा कार्यालयाने शासनास सादर करावा. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी केवळ हरित ऊर्जा निधी अंतर्गतच्या योजना/घटकांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल, याची खातरजमा करण्यात यावी. विहित कालावधीत सदर निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च न होता महाऊर्जा कार्यालयाकडे पडून राहिल्यास त्याची संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. मान्य व अनुज्ञेय काळात खर्च करण्याची जबाबदारी महासंचालक, महाऊर्जा यांची राहील. याबाबतचा त्रैमासिक अहवाल न चुकता सादर करण्याची जबाबदारी लेखाविषयक बाबी हाताळणाऱ्या सहायक/उप संचालक (लेखा) म्हणून कार्यभार पाहणाऱ्या अधिकाऱ्यांवर टाकण्यात यावी.

५. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे या कार्यालयाने यांनी आवश्यक तेव्हा महालेखापाल, मुंबई, महाराष्ट्र-१ यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

६. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक के-६, २८१० नवीन व नवीकरणीय ऊर्जा, (००) (०५) महाराष्ट्र ऊर्जा विकास निधीमधून भागविलेला खर्च (कार्यक्रम), ५०, इतर खर्च (२८१००१२३)" या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यात यावा. या लेखाशीर्षाखाली निधी वितरीत

करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, सदर देयक सशर्त असून या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही, तसेच, उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

७. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना निधी वितरीत करताना संदर्भाधिन क्र.४ व ७ येथील शासन परिपत्रकातील आवश्यक त्या सूचना व अटींचे पालन करून व वित्त विभागाने ई-फाईल क्र.१५०७२७४ वर दि.२५.०२.२०२६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०३११११५५३८२६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAYANT SHARAD SAGADE

Digitally signed by JAYANT SHARAD SAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=A6FD5F8313A5DBBC809E855BE10E149644DDC66D66F20F36D4D55BCFB56CEB55, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CAF6324C416282449C4078681A5B8972EB1D149920D77CC78A41448DF59C4C9, cn=JAYANT SHARAD SAGADE
Date: 2026.03.11 11:56:31 +05'30'

**(जयंत सागडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
३. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक व औफाफ), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मंत्री (अपारंपरिक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई,
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
१७. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१८. अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२०. सचिव, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
२१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या.,मुंबई,
२२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
२३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२४. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,

२६. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे,
२७. सर्व जिल्हाधिकारी,
२८. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
२९. सह सचिव (ऊर्जा-७/३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
३०. कक्ष अधिकारी (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना ०३ मूळ प्रतींमध्ये पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
३१. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
३२. निवड नस्ती/ऊर्जा-७.